दैनिक
www.lokaarambh.com
# लोक आरंभ
संपादक: राहुल मारोतीराव वाईकर
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
बीड | वर्ष - ०४ थे | अंक २६ | बुधवार ०७ जानेवारी २०२६ | RNI/MAHMAR/2022/84215 | पान ४
Beed | year - ०4 th | Issue 26 | Wednesday 07 January 2026 | RNI/MAHMAR/2022/84215 | Page 4



## तुमको मिर्ची लगी तो मैं क्या करू... देवेंद्र फडणवीस

धुळ्याचे भौगोलिक स्थान महत्वाचे आहे. आमचे जयकुमारभाऊ सांगत होते, धुळे हा उज्वल इतिहास असलेला जिल्हा आहे. महाराष्ट्राचं प्रवेशद्वार धुळे आहे, एका बाजूला गुजरात आणि दुसऱ्या बाजूला मध्य प्रदेश आहे. एकेकाळचे अतिशय प्लान्ट शहर आहे. या शहरात अनेक वर्षात विकासाची कामेन झाल्याने शहराची अवस्था बिकट झाली होती. 2003 साली स्थापन झालेल्या या मनपाने पहिल्यांदा विकास पाहिला तो, भाजपच्या काळात पाहिला. 2 वर्षांनी ही महापालिका रौप्य महोत्सव साजरा करणार आहे. या महापालिकेला विकासाकडे नेण्याचा संकल्प करण्यासाठी या ठिकाणी मी हजर झालो आहे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धुळे शहरात झालेल्या भाषणात ठणकावून सांगितले. देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, बहिणींची संख्या भावांपेक्षा जास्त आहे, हे मान्य केलं पाहिजे. उमेदवारी महिला जास्त आहेत. जिथे नजर जाते तिथपर्यंत मला नागरिकच नागरिक दिसत आहेत. गिरीश भाऊंचं भाषण होणार होतं, त्यांचा आवाज बसला आहे, त्यांनी खूप भाषणं केली, कामे केली, त्यामुळे मी त्यांना सांगितलं एक दिवस तुमच्या घशाला आराम द्या. केवळ धुळ्याचा आकडा काढू नका, इतर ठिकाणचे आकडे काढून आम्हाला विजयी करा. पत्रकारांच्या सोयीसाठी सांगतो गिरीशभाऊ फक्त राजकारणातले आकडे काढतात, दुसरे कुठले आकडे काढत नाहीत असाही टोला यावेळी फडणवीस यांनी लगावला. नळ उघडेल तर पिण्याचं स्वच्छ पाणी आले पाहिजे आमच्या या नेत्यांच्या पाठपुराव्यामुळे 170 कोटी रुपये पाण्याच्या योजनेला आपण दिले, आधी 10 दिवसाला धुळ्याला पाणी येत होते. धुळ्यातील प्रत्येक दिवशी माझी माता नळ उघडेल तर पिण्याचं स्वच्छ पाणी आले पाहिजे हे आपलं स्वप्न आहे.

### तुमको मिरची लगी तो मैं क्या करु ?

आमच्या गिरीश भाऊंच्या नेतृत्वात, पूर्ण बहुमत धुळेकरांनी भाजपला दिलं आहे. जी आश्वासनं या मंचावरुन दिली होती ती पूर्ण करण्याचे काम मी केले आहे. आपल्यासमोर मी उपस्थित आहे. यावेळी तुम्ही कमालच केली आहे. सुरुवातीलाच चौकार मारला. धुळ्यात 4 नगरसेवक निवडून आणले. विरोधकांना मिरची लागली, तुमको मिरची लगी तो मैं क्या करु ? धुळेकरांनी आमचे नगरसेवक बिनविरोध दिले, तर लोकशाहीचा खून झाला म्हणणाऱ्यांचे डोके कुठे आहे ? अशा सवाल यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केला.

## पोलीस वर्धापन दिनाच्या निमित्ताने सपोनि सानप, उपनिरीक्षक जाधवर यांच्याकडून युवकांसाठी प्रेरणादायी संवाद

बीड । प्रतिनिधी
आज दि.5 जानेवारी 2026 रोजी पोलीस वर्धापन दिनाच्या निमित्ताने पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत आणि अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर व उपविभागीय पोलीस अधिकारी पुजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतुक शाखेचे सपोनि सुभाष सानप यांनी मातोश्री विद्यालय वंजारवाडी तसेच पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पाली, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चौसाळा या ठिकाणी विद्यालयाच्या युवक-युवतींसोबत संवाद साधून त्यांना पोलीस खात्याची काम करण्याची पध्दत तसेच वाहतुकीचे नियम याविषयी संवाद साधला यावेळी चौसाळा जि.प.शाळेचे मुख्याध्यापिका हंपे मॅडम व शिक्षकवृंद उपस्थित होते तसेच पाली येथील शाळेचे मुख्याध्यापक श्री.लाड सर व विद्यालयाचे शिक्षकवृंद उपस्थित होते आणि वंजारवाडी येथील मातोश्री विद्यालयाचे मुख्याध्यापक नागरगोजे व शिक्षकवृंद उपस्थित होते.
यावेळी महिला भगिनी व मुलींची सुरक्षितता, वाहतुकीचे नियम, वडीलधाऱ्यांचा मान सन्मान,



देशासाठीची कर्तव्ये, सायबर सुरक्षा, गुड टच बॅड टच, डायल 112, हेल्पलाईन नंबर 1098, बालविवाह, बालकामगार लहान मुलांबद्दल गुन्हे, महिला हेल्पलाईन 1091 या विषयी विस्तृत माहिती दिली. नशेच्या पदार्थाचे सेवनाचे दुष्परिणाम, सोशल मिडीयाचा गैरवापर, मोबाईलचे होणारे दुष्परिणाम तसेच मोबाईलवरील ॲप्स, इंस्ट्राग्राम, फेसबुक, ट्विटर, टेलिग्राम, व्हाट्सअॅप इत्यादी ॲपमुळे होणारे गुन्हे याबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच यावेळी पो.ह.नागेश पायाळ यांनी जि.प.माध्यमिक शाळा चौसाळा येथे आपले मनोगत व्यक्त केले. या अभियानात पोलीस हवालदार नागेश पायाळ, आदिनाथ मुंडे, पांडूरंग दराडे, विष्णु काकडे, त्रिंबक कुडके, पोलीस हवालदार चालक संतोष हारके, चालक दत्ता कदम यांनी सहभाग नोंदवला.

## कवयित्री कविता काळे यांच्या “गुंता” या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा संपन्न.....



९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सातारा,३ जानेवारी २०२६ हा दिवस आम्हां महिलांच्या जीवनात आशेचा किरण देणारा दिवस आहे,कारण यामुळे भारतातील स्त्रियांचा जीवनातला अंधार संपला असं म्हणायला हरकत नाही. सावित्रीने जर आमच्या शिक्षणाची वाट खुली केली नसती तर,चूल आणि मूल एवढंच आमचं आयुष्य होत.जिच्या मुळे मी चार अक्षर शिकले अगदी तिच्या जन्मदिनी हा सोहळा आणि ते ही ९९ व्या संमेलनात डॉ.राजा दीक्षित,अध्यक्ष,राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ,प्रा.डॉ.संदीप सांगळे, अध्यक्ष,मराठी अभ्यास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,घनश्याम पाटील,चपराक प्रकाशन,प्रा. हेमंत सामंत,ब्रिटिश कौन्सिल शालेय राजदूत,विश्वास वसेकर, ज्येष्ठ समीक्षक,डॉ.शिवाजी शिंदे,असिस्टंट रजिस्ट्रार पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर, सोलापूर विद्यापीठ.तसेच मसूद पटेल,संजय जगताप,पिंपरी चिंचवड,संतोष गाढवे,राजगुरूनगर, जीवन धेंडे,बार्शी,नवनाथ खरात,करमाळा,आत्तम गेंदे,परभणी,प्रतिमा काळे,निगडी,रघुनाथ कांबळे,पुणे इत्यादिंच्या उपस्थितीत हा प्रकाशन सोहळा उत्साहात संपन्न झाला.



## बीड जिल्ह्यातील रिपाइं नगरसेवकांचा रिपाइंच्या वतीने सत्कार

### रिपाइं नगरसेवकांचे हे यश कार्यकर्त्यांच्या कष्टाचे फलित:पप्पू कागदे

बीड/प्रतिनिधी
रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (रिपाइं) बीड मध्यवर्ती कार्यालयात रिपाइं नगरसेवकांचा भव्य सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. नुकत्याच झालेल्या नगर परिषद निवडणुकीत जनतेचा विश्वास संपादन करून यश मिळवलेल्या लक्ष्मण सिरसट(धारुर), कार्तिक कांबळे (परळी), भारत कांबळे व शीतल चक्रे (बीड), रितू सुजित वैरागे (धारुर) या नगरसेवकांचा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या हस्ते पुष्पहार, शाल व फेटा बांधून त्यांचा सत्कार करण्यात आला.
यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना पप्पू कागदे म्हणाले की, रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यातील पाच नगरसेवक निवडून आलेले आहेत. रिपाइंच्या नगरसेवकांनी मतदारांनी टाकलेल्या विश्वासाला तडा न जावू देता, प्रामाणिकपणे काम करणे हीच खरी जबाबदारी आहे. बीड जिल्ह्यात रिपाइंची मजबूत बांधणी असल्यामुळे व पक्षाची ताकद असून कार्यकर्ते यांच्या एकजुटीमुळे हे यश शक्य झाले आहे. दरम्यान नगर सेवकांच्या सत्काराप्रसंगी युवा रिपाइं प्रदेश अध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या हस्ते प्रशांत बोराडे यांनी प्रकाशित केलेल्या तथागत दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी राजू जोगदंड, किसन तांगडे, किशोर कांडेकर, धोंडीराम सिरसट, मायाताई मिसळे, रेश्माताई जोगदंड, बापू पवार, शाहू डोळस, अविनाश जोगदंड, प्रभाकर चांदणे, संभाजी गायकवाड, सिद्धीक फारुकी, विलास जोगदंड, संजय हनवते, धम्मा पारवेकर, अक्षय कांबळे, प्रा.बाळासाहेब गव्हाणे, कपिल कागदे, अक्षय कोकाटे, भैय्यासाहेब साळवे, गौतम कांबळे, प्रितम चक्रे, नामदेव वाघमारे, शाम वीर, के.के.कांबळे, सुनिल कांबळे, भागवत गायसमुद्रे, बाळू माटे, सचिन वडमारे, कुमार अरुण, भैय्यासाहेब कांबळे, यांच्यासह रिपाइं पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## जवाहर विद्यालयात आनंदनगरी संपन्न



प्रदीप पोटफोडे
आज दि. ०६ मंगळवार रोजी जवाहर मा.व उच्च मा.विद्यालय पाचोड येथे कै.पंढरीनाथ पाटील ढाकेफळकर उर्फ भाऊ यांच्या पुण्यतिथी निमित्त क्रीडा सप्ताह अंतर्गत आज आनंद नगरी चे आयोजन आ. मुख्याध्यापक/ प्राचार्य प्रभाकर खंबाट सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. विद्यालयाच्या प्रांगणामध्ये विद्यार्थ्यांनी खाद्य पदार्थ च्या उभारलेल्या स्टॉलनी सर्वांचे लक्ष वेधले होते विद्यार्थ्यांनी जवळपास विविध पदार्थांचे साबुदाणा वडा ,पोहे, वडापाव समोसा पाणीपुरी ,रगडा ,झुणका भाकर व ठेचा, असे विविध ५० स्टॉल लावले होते या मधून विद्यार्थांनी जीवनात व्यवहारीक ज्ञानाचा अनुभव घेतला. या आनंदनगरीचे उदघाटन प्रा. राजकुमार भुमरे यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी हायस्कूल विभाग प्रमुख राजाराम धांडे व मिडल विभाग प्रमुख सुभाष अवघड सर त्यांच्या सोबत उपस्थित होते तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुरेश बढे, विजय लिहिणार, प्रभाकर कांबळे, संतोष जाधव, उमेश नारळे, बाबुराव सरकुंडे, अभिजीत रोडे, सुरेश बलपेलवाड, गणेश कुलकर्णी, सुरेंद्र सरकटे, प्रतिभा नारळे,कौशल्या भोजने, प्रा.प्रितम पाटील,प्रा.बापू रायते, प्रा.सुधाकर सुसर, प्रा.श्रीनिवास शहापुरकर प्रा. पवार मॅडम, दिपक खरात, अशोक शेळके,रंगनाथ काळे यांनी परिश्रम घेतले पंचक्रोशीतील पालक व विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आनंदनगरीचा मनमुराद आनंद घेतला.

## पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत यांनी दिला विद्यार्थ्यांना शिस्त, सुरक्षितता आणि स्वप्नांचा मंत्र

### एस.पी.ऑफिस येथे विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**
विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, कायद्याची जाणीव आणि उज्ज्वल भविष्यासाठी योग्य दिशा निर्माण करण्याच्या उद्देशाने पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत व अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर आणि प्रशिक्षणार्थी आयपीएस राहुल कुमार यांच्या उपस्थितीत पोलीस वर्धापन दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यशाळा पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड या ठिकाणी संपन्न झाली. या कार्यशाळेत पोलीस अधिक्षकांनी विद्यार्थ्यांसोबत थेट संवाद साधत शिक्षणासोबतच शिस्त, जबाबदारी, निर्व्यसनी राहणे, सोशल मिडीयाचा



योग्य वापर कसा करावा याची माहिती दिली. सदरील कार्यशाळेमध्ये श्री. शिवाजी विद्यालय व संस्कार विद्यालयाचे विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. यावेळी पोलीस अधिक्षक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, चुकीच्या एका क्लिकमुळे संपुर्ण आयुष्य डिस्टर्ब होवून जाते तुम्ही आजचे विद्यार्थी हे उद्याचे देशाचे भवितव्य आहात त्यामुळे तुम्ही जीवनात असे ज्ञान प्राप्त करा की त्याचा तुम्हाला आणि समाजाला व देशाला लाभ झाला पाहिजे. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर व पोलीस हवालदार बाळासाहेब नागरगोजे यांनी विद्यार्थ्यांना पोलीस नियंत्रण कक्ष येथे पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, सायबर शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप अराक, अनैतिक मानवी प्रतिबंधक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव, दहशतवादी विरोधी पथक पीएसआय शेखर औटे , जिल्हा विशेष शाखेचे पोलिस निरीक्षक मुकूंद कुलकर्णी , जिल्हा वाहतुक शाखेचे सपोनि सुभाष सानप येथे प्रत्यक्ष दर्शनीस्थळी नेवून संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांच्यासोबत संवाद साधून दिला व मार्गदर्शनपर माहिती दिली. तसेच यावेळी शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र वाघमारे व शिक्षक अमोल वाघमारे, शंकर सांगळे यांची उपस्थिती होती तर संस्कार विद्यालयाचे मुख्याध्यापक दिपक सरदे, प्रशासकीय अधिकारी राजेश राजहंस, शिक्षक रामदास भोसले व बापू भोसले यांची उपस्थिती होती.

दैनिक लोकआरंभ

बुधवार ०७ जानेवारी २०२६

www.lokaarambh.com



सं पा द की य

## महाराष्ट्रधर्म टिकवण्याची शेवटची संधी

मुंबई महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मराठी भाषा, संस्कृती आणि मराठी माणसाच्या हक्कांवर पुन्हा एकदा निर्णायक संघर्ष उभा राहिला आहे. या लेखातून ङ्गमराठीनामाफ्च्या निमित्ताने महाराष्ट्रधर्म टिकवण्यासाठीची दिशा स्पष्ट केली आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत उतरलेले सर्वच प्रमुख दावेदार पक्ष यावेळी, मुंबईचा महापौर मराठीच होणारफ असं स्वतःहून सांगत आहेत. हिंदीसक्तीच्या विरोधात सुरू झालेले मराठी भाषाभिमानी आंदोलन गेले काही महिने क्रमाक्रमाने प्रभावी बनत गेल्याचा हा परिणाम आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व महाराष्ट्र नवनिर्माण सेना हे त्यांच्या जन्मापासूनच मराठीच्या वापराबाबत आग्रही आहेत. त्या पक्षांचा मराठीबाबतचा आग्रह सर्वांना परिचित आहे. शिंदे सेनेला त्यांच्या दिल्लीतील सत्ताधाऱ्यांच्या कृपेने अजूनही न्यायालयीन संरक्षण मिळाले असल्याने, ते जरी स्वतःला शिवसेना म्हणवून घेत असले तरी त्यांची ज्या भारतीय जनता पक्षासोबत युती आहे त्यांच्या तालावरच त्यांना कदमताल करावा लागत आहे आणि लागणार आहे. त्यामुळे जनरेट्यामुळे जरी ते मराठीबाबत बोलत असले तरी अखेर भाजप ठरवणार तेच त्यांना करावे लागणार. भाजप केवळ काँग्रेससारखा राष्ट्रीय पक्ष आहे म्हणून नाही, तर त्यांची जननी असणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला, देशभरात व हिंदू धर्मात असलेली व्यापकता आणि बहुविविधता मान्य नाही. त्यामुळे एक राष्ट्र, एक धर्म, एक भाषा असे म्हणत देशभर हिंदी भाषा प्रचलित करणे हा त्यांच्या सांस्कृतिक राजकारणाचा पाया आहे. त्यामुळे भाजपची भूमिका हिंदीवादीच असणार, हे मुंबईकरांनी लक्षात ठेवावे! भाजपमध्ये मूळ संघ दक्ष नेत्यांपेक्षा सध्या आयारामांचा अधिक बोलबाला आहे. हे बाहेरून आलेले शिलेदार संघ भाजपची भाषा अधिक आक्रमकतेने मांडून आपणच खरे स्वामीभक्त, असे ठसवण्याची संधी साधत असतात. अशा ना. नीलेश राणे वा कृपाशंकर सिंह यांच्या मुखाने संघनीती पेरत राहणे राज्यातील भाजप नेत्यांना सहज सुकर बनले आहे. मुंबईतील मेट्रो बांधणीत राज्य सरकारने कॉर्पोरेट कंपन्यांपुढे लोटांगण घातले. मेट्रो स्थानकांची नावे नक्की करताना मुंबईचा इतिहास, परंपरा, धार्मिक आणि सामाजिक मानबिंदू या सगळ्या बाबी शासनाने सहजपणे गुंडाळून ठेवल्या. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र दिनी मराठी अभ्यास केंद्राच्या पुढाकाराने व समविचारी संस्था–संघटनांच्या सहकार्याने राज्य सरकारच्या पहिलीपासून हिंदी सक्ती विरोधातल्या पत्रकार परिषदेने राज्याच्या राजधानीत मराठीचे बिगुल पुन्हा वाजवण्यात आले. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात १०७ हुतात्म्यांची शहादत देत १९६० साली मुंबईसह महाराष्ट्र राज्य मिळवत असताना, मुंबईत मराठीचा एल्गार दुमदुमला होता. मात्र मुंबई महापालिकेत इंग्रजीचाच बोलबाला होता. त्याविरोधात पहिला आवाज उठवला कर्नाटकातून नोकरीच्या शोधात मुंबईत आलेल्या जॉर्ज फर्नांडिस यांनी! १९६३ साली जॉर्ज महापालिकेत नगरसेवक म्हणून प्रथम निवडून गेले. महापालिकेच्या सभेत त्यावेळी महापौर जेव्हा इंग्रजीत भाषण करू लागले तेव्हा जॉर्ज फर्नांडिस आणि त्यांचे समाजवादी साथी उभे राहून त्यांनी महाराष्ट्र राज्याच्या राजधानीच्या शहरातील महापालिकेत, मराठीतच बोलले पाहिजे, सर्व व्यवहार मराठीतच झाले पाहिजेत, असा आग्रह धरला. त्याच्यानंतर १९६६ साली शिवसेनेचा जन्म झाला. मराठीच्या सन्मानाचा मुद्दा त्यांनी लावून धरला. राजकारणाच्या ओघात पुढे शिवसेना भाजपसोबत गेली व मराठीचा मुद्दा मागे पडला. मुंबईतल्या जमिनी बिल्डरांच्या घशात जाऊ देत मराठी कामगार काम करत असलेल्या गिरण्या आधी बंद झाल्या. मग गिरणी कामगार बेघर झाला आणि मुंबईतून मराठी हद्दपार होण्याच्या कड्यावर येऊन ठेपली. भाषा ही केवळ संवाद माध्यम नसून संस्कृती, परंपरा, आपुलकी आणि बांधिलकीची वाहक असते. देशातील अन्य राज्यात जनतेने आपापल्या भाषांचा वापर सहजभावाने टिकवून ठेवत हे दाखवून दिले आहे. त्यामुळेच मुंबईत मराठी भाषा, शाळा आणि मराठी माणसाच्या हक्कांसाठी सुरू झालेला लढा, महाराष्ट्रधर्मावर आधारित मराठीकरणाकडे जात आहे. आगामी निवडणुकांच्या काळात हा लढा अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी, प्रकाशित करण्यात आलेला पुढील जाहीरनामा फार महत्त्वाचा आहे. महानगरपालिकेसाठी मराठीनामा जाहीरनाम्यात म्हटले आहे की, ङ्गराजकीय पक्ष आणि धर्म कोणताही असो, मराठी उमेदवारालाच प्राधान्य द्या. जिथे एकापेक्षा जास्त मराठी उमेदवार आहेत तिथे मराठी शाळा, भाषा, मराठी माणूस आणि महाराष्ट्राची संस्कृती याला महत्त्व देणाऱ्या उमेदवाराला प्राधान्य द्या. सार्वजनिक ठिकाणी मराठी नीट बोलू शकणाऱ्या उमेदवारालाच पसंती द्या. निवडणुकीचा प्रचार, प्रसार मराठीतून करणाऱ्या उमेदवारालाच प्राधान्य द्या. स्थलांतरितांसाठी महाराष्ट्राची भाषिक, सांस्कृतिक ओळख पुसून टाकणाऱ्या मराठी/ अमराठी उमेदवाराला नाकारा. महानगरपालिका प्रशासनासंदर्भात मागण्या आहेत, महापौरांसह सर्व समित्यांचे अध्यक्ष मराठीच हवेत. महानगरपालिकेच्या संकेतस्थळासह पालिकेचे सर्व प्रकारचे आर्थिक आणि प्रशासकीय व्यवहार, खरेदी आदेश, पावत्या मराठी भाषेतच उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. महानगरपालिका हद्दीतील दुकानांच्या पाट्या मराठीत नसणाऱ्या दुकानदारांवर कठोर आणि तातडीने दंड वसूल करावा. अंमलबजावणीत हयगय करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. मांसाहारावरून घरे नाकारणाऱ्या संस्थेच्या निवासी इमारती अनधिकृत ठरवून त्यांचे पाणी,

# गेवराईत व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने मुकबधीर विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

गेवराई : प्रतिनिधी

मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त साजरा होणारा दर्पण दिन यावर्षी गेवराई शहरात सामाजिक बांधिलकी जपत उत्साहात साजरा करण्यात आला. व्हॉईस ऑफ मीडिया पत्रकार संघाच्या वतीने येथील कै. भगवानराव ढोबळे मुकबधीर व मतिमंद निवासी विद्यालयात हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला आमदार विजयसिंह पंडित, डिवायएसपी अनिल कटके, शिवसेना प्रमुख उध्दव मडके यांच्यासह विविध पक्ष, सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीस दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून उपस्थितांनी अभिवादन केले. त्यानंतर विद्यालयातील मुकबधीर व मतिमंद विद्यार्थ्यांसाठी सामाजिक उपक्रम राबवित वह्या, पेन, शैक्षणिक शालेय साहित्य तसेच खाऊ वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. पत्रकारितेचा खरा अर्थ केवळ बातम्या देणे नसून समाजातील वंचित घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविणे हाच आहे. अशा उपक्रमांमुळे पत्रकारितेच्या सामाजिक भूमिकेला बळ मिळते, असेही मत व्यक्त उपस्थित मान्यवरांकडून व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्हॉईस ऑफ मीडिया बीड जिल्हा उपाध्यक्ष भागवत जाधव यांनी केले. तर सूत्रसंचालन प्रा. सुनील मुंडे यांनी केले, आभार भास्कर सोळुंके यांनी मानले. दरम्यान दर्पनदिनाचे औचित्य साधून अनेकांनी व्हॉईस ऑफ मीडियाच्या पदाधिकारी, सदस्यांचा सन्मान केला. या कार्यक्रमाला व्हॉईस ऑफ मीडिया बीड जिल्हा उपाध्यक्ष विनोद नरसाळे, भागवत जाधव, तालुकाध्यक्ष विनोद पौळ, सचिव, सुनील मुंडे, सुशील टकले, भारत सोळुंके, तुकाराम धस, उपाध्यक्ष विष्णू गायकवाड, कार्याध्यक्ष राजेश राजगुरू, वैजिनाथ जाधव, सचिन डोंगरे, कामराज चाळक, आर.आर.बहिर, अजहर इनामदार, शेख आतिखभाई, अण्णासाहेब राठोड, शेख आसेफ, शेख यासीन, रविराज कुटे, अमोल इनामदार, विनायक उबाळे यांची उपस्थिती होती.

# मठ गल्लीतील अतिक्रमण तत्काळ काढण्याची जोरदार मागणी

## सामाजिक कार्यकर्ते मुकुंद साखरे आक्रमक – नगरपरिषदेकडे लेखी निवेदन

धारूर | प्रतिनिधी :
किल्ले धारूर शहरातील कसबा विभागातील मठ गल्ली परिसरात मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिक्रमणामुळे नागरिकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत असून, हे अतिक्रमण तत्काळ हटवावे अशी ठाम मागणी सामाजिक कार्यकर्ते मुकुंद रंगनाथ साखरे यांनी नगरपरिषद प्रशासनाकडे केली आहे. मठ गल्ली येथील घारेश्वर मंदिरापासून पद्माकर तिबोले व राजेभाऊ मनोहर तिबोले यांच्या घरापर्यंतच्या सार्वजनिक रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. या अतिक्रमणामुळे रस्त्याचा मूळ उद्देशच बाधित होत असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर त्याचा गंभीर परिणाम होत आहे.

अतिक्रमणामुळे निर्माण झालेल्या प्रमुख समस्या
नागरिकांच्या ये-जा करण्यास मोठा अडथळा
कचरा वाहतूक व शाळकरी मुलांच्या बस वाहतुकीस अडचणी
सार्वजनिक रस्त्याचा वापर खासगी स्वरूपात होत असल्याचा आरोप
आपत्कालीन सेवांसाठी मार्ग अरुंद होण्याची शक्यता

या सर्व बाबी लक्षात घेता महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम व प्रचलित नियमांनुसार नगरपरिषद कार्यालयाने पी.टी.आर. तपासणी करून उर्वरित जागेवर झालेले अतिक्रमण तात्काळ हटवावे, अशी लेखी मागणी मुकुंद साखरे यांनी केली आहे.

प्रशासनाचे दुर्लक्ष – नागरिकांमध्ये नाराजी
विशेष म्हणजे, आतापर्यंत या अतिक्रमणाकडे कोणीही गांभीर्याने लक्ष दिले नसल्याची भावना स्थानिक नागरिकांतून व्यक्त होत आहे. शहरात अनेक ठिकाणी रस्त्यावर अतिक्रमण वाढत असून याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. मात्र, या प्रश्नावर सामाजिक कार्यकर्ते मुकुंद साखरे हे ठामपणे पुढे आले असून त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

“अतिक्रमण काढणे ही काळाची गरज” – मुकुंद साखरे
प्रसारमाध्यमांशी बोलताना मुकुंद साखरे म्हणाले,
> “मठ गल्लीतील अतिक्रमणामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. हा सार्वजनिक रस्ता असून त्यावर अतिक्रमण होणे चुकीचे आहे. नवनिर्वाचित नगराध्यक्ष यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन लवकरात लवकर अतिक्रमण काढून रहदारीसाठी रस्ता मोकळा करतील, अशी आम्हाला अपेक्षा आहे.”

नवनिर्वाचित नगराध्यक्षांकडून सकारात्मक अपेक्षा
शहरातील नागरिकांना नवनिर्वाचित नगराध्यक्षांकडून या प्रकरणात ठोस व त्वरित कारवाईची अपेक्षा आहे. अतिक्रमण हटवून मठ गल्लीतील रहदारी सुरळीत केल्यास नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

एकूणच, मठ गल्लीतील अतिक्रमणाचा प्रश्न गंभीर बनत असून, प्रशासनाने तात्काळ निर्णय घेऊन कारवाई करणे अत्यावश्यक झाले आहे.

# संजय बापू पवार मित्र मंडळाच्या वतीने संजय पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन.

## सह्याद्री देवराई येथील वृक्षांना पाच लक्ष लिटर पाणी व जि.प शाळांमध्ये मॅजिक पेपर पॅडचे वाटप.

पालवन/ प्रतिनिधी - पालवण येथील बहुआयामी व दूरदृष्टी नेतृत्व म्हणून ओळख असलेले संजय बापू पवार यांच्या 41व्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त सह्याद्री देवराई येथील वृक्षांना पाच लक्ष लिटर पाणी व लिंबागणेश सर्कल मधील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये मॅजिक पेपर पॅडच्या वाटपाचे आयोजन संजय बापू पवार मित्र मंडळ यांच्या वतीने करण्यात येणार असून सदरील उपक्रमावेळी लिंबागणेश सर्कलमधील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संजय बापू पवार मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आलेले आहे. पालवण येथील युवा नेतृत्व व सामाजिक कार्यामध्ये कायम अग्रेसर असलेले संजय बापू



पवार यांच्या 41 व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या मित्र परिवाराकडून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले असून यामध्ये सह्याद्री देवराई येथील वृक्षांना पाच लक्ष लिटर पाणी तर लिंबागणेश सर्कल मधील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये मॅजिक पेपर पॅड वाटप करण्यात येणार आहेत तरी या अभिष्टचिंतन विशेष उपक्रमाला लिंबागणेश सर्कल मधील नागरिकांनी उपस्थित राहत बापूंना दीर्घायुष्याच्या शुभेच्छा द्याव्यात व या उपक्रमाला मोठी उपस्थिती लावावी असे आवाहन संजय बापू पवार मित्र मंडळ लिंबागणेश सर्कल यांच्याकडून करण्यात आलेले आहे.

# बीड शहरातील नागरिकांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी भाजप आक्रमक

## भाजप गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह नगरसेवकांचे सीओंना निवेदन

**बीड (प्रतिनिधी)**
दि.६ : नगरपरिषद निवडणुकीनंतर बीड शहरातील विविध प्रभागांमधील नागरिकांनी मूलभूत नागरी सुविधांबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी व मागण्या केल्या आहेत. त्या तातडीने मार्गी लावाव्यात, अशी मागणी नगरपरिषदेतील भाजपच्या गटनेत्या डॉ.सारिकाताई योगेश क्षीरसागर यांनी मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्याकडे मंगळवारी (दि.६) निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी भाजपच्या नगरसेवकांसह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.
बीड शहरातील पाणी पुरवठा, स्वच्छता, विद्युत व्यवस्था, आवास योजना, पार्किंग, महसूल वाढ, तसेच बिंदुसरा नदी सुशोभिकरण यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर मागण्या मांडण्यात आल्या. निवेदनात पुढे म्हटले की, प्रामुख्याने नागरिकांना दोन ते तीन दिवसाआड नियमित पाणी पुरवठा कसा करता



येईल, याबाबत नियोजन करावे. काडीवडगाव व माजलगाव बॅक वॉटर येथे सोलार सिस्टीम बसवून वीजबिलाचा खर्च कमी करण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच, काडीवडगाव-ईट बीड पाईपलाईनवरील गळती तातडीने दुरुस्त करावी. बिंदुसरा धरणावरून धानोरा रोड मार्गे नवीन पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव तयार करून शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. सर्व प्रभागांमध्ये घंटागाड्या नियमित व नियोजनबद्धपणे फिरतात की नाही, यावर नियंत्रण ठेवावे. घंटागाड्यांवर जीपीएस ट्रॅकर बसवून त्या सध्या कोणत्या भागात आहेत, याची माहिती नागरिकांना मिळेल, अशी व्यवस्था करावी. तसेच नवीन घंटागाड्या, कॉम्पॅक्टर व जेसीबी खरेदी करण्याची मागणीही करण्यात आली आहे. शहरातील छोट्या चौकाचौकात मिनी हायमास्ट बसवावेत. नवीन पथदिवे बसवून बंद किंवा नादुरुस्त असलेले पथदिवे तातडीने सुरू करावेत. नगर परिषद कार्यालयावर सोलार सिस्टीम बसवावी आणि मोठ्या चौकांतील हायमास्ट दिवे नियमितपणे सुरू ठेवावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. शहरातील सर्व मालमत्तांची नोंद नगर परिषदेच्या रेकॉर्डमध्ये घेऊन त्यावर योग्य ती कार्यवाही करावी, जेणेकरून नगर परिषदेच्या महसुलात वाढ होईल. तसेच, पंतप्रधान आवास योजना व रमाई घरकुल योजनेचे नवीन प्रस्ताव मंजूर करावेत. तसेच ज्यांना घरे मंजूर झाली आहेत, त्यांचे पुढील हप्ते तातडीने वितरित करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. बीड शहरात विविध ठिकाणी सार्वजनिक पार्किंगची सुविधा निर्माण करावी. दर चतुर्थीला वेळेवर सायरन वाजवण्यात यावा. तसेच, बिंदुसरा नदी सुशोभिकरणाचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावा, अशीही मागणी केली आहे. शहरातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित या सर्व नागरी सुविधा तातडीने पूर्ण करण्यात याव्यात, अशी मागणी डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी निवेदनात केली आहे. या मागण्यांकडे नगर परिषद प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

### मुख्याधिकाऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद

भाजपच्या शिष्टमंडळाने केलेल्या मागण्या पूर्ण करण्यात येतील. आवश्यक ती कार्यवाही करुन नागरिकांना अधिकाधिक सुविधा देण्याचा प्रयत्न नगरपरिषद प्रशासनाचा राहील, असा सकारात्मक प्रतिसाद मुख्याधिकाऱ्यांनी दिला आहे. यावेळी नगरसेवकांनी प्रभागातील समस्या मांडल्या.

# असले 56 अजित पवार मी खिशात घेऊन फिरतो, असदुद्दीन ओवैसी

सोलापुरात एमआयएमचे राष्ट्रीय अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांची प्रचारसभा झाली. एमआयएमचे प्रदेश कार्याध्यक्ष फारूक शाब्दी यांनी राजीनामा दिला आहे. त्याचा उल्लेख करत ओवैसी यांनी सोलापुरातील पक्षात कोणी नाराज असेल तर मी त्याच्या घरी जाईन, मी फारूक शाब्दी यांचा राजीनामा स्विकारलेला नाही.जोपर्यंत मी त्याच्या कुटूंबातील लोकांशी बोलत नाही, तोपर्यंत मी राजीनामा स्विकारणार नाही असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी राष्ट्रवादीचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर असदुद्दीन ओवैसी यांनी जोरदार टीका केली. आंदोलनवेळी माझ्यावर लाठीचार्ज झाला त्यावेळी माझे 4 बोटे तुटली, डोक्यात 18 टाके पडले आणि मणक्यात गॅप पडला. त्यावेळी त्यावेळी माझ्या वडिलांनी याबद्दल




बंद पुकारला नाही.त्यामुळे मी असलो नसलो तरी तुम्ही एमआयएमला मतदान करणार की नाही असा सवाल असदुद्दीन ओवैसी यांनी उपस्थितांना केला. एमआयएमला सोडचिट्टी देणाऱ्या फारूक शाब्दी यांचा उल्लेख करत ते म्हणाले की 790 वोट घेतलेला मला धमाकावतो काय, मी शुक्रवारची नमाज तुझ्या गल्लीत येऊन करतो असे आव्हान असदुद्दीन ओवैसी यांनी शाब्दी यांना केले. ते पुढे म्हणाले की तुझ्या घरातील लोकं एमआयएमला मतं टाकतील त्यामुळे मस्ती करु नको असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. गुजरातमध्ये पेट्रोल 97 रुपये आणि सोलापुरात 104 रुपये आहे. अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांची कोणासाठी सेटिंग सुरु आहे. महाराष्ट्रातील पेट्रोलचे दर थोडे कमी करा. अजित पवार म्हणाले होते धरणात मुतू का? अजित पवार सोलापूरला आलेला निधी कुठे गेला? सोलापुरात मन्सूरी कुटुंबातील 10 लोकं जळून मेले. सोलापूरात 8 दिवसातून एकदा पाणी येते आणि मोदी म्हणतात 'नल से जल, जल से नल' अशी टीका ओवैसी यांनी यावेळी केली. सोलापूरातील महिलांचे मी कौतुक करतो की त्या पहाटे 2 वाजता पाणी भरण्यासाठी उठतात. सोलापूर महापालिकेचे 1300 कोटी बजेट आहे, मग पैसे कुठे जातात असा सवाल ओवैसी यांनी यावेळी केला. अजित पवारना व्होट म्हणजे मोदीना व्होट त्यामुळे तुम्ही अजित पवारना मतं देणार का? त्या दोन नंबर धंदे करणाऱ्याला (तौफिक शेख) व्होट देणार का? असाही सवाल ओवैसी यांनी केला.

असले 56 अजित पवार मी खिशात घेऊन फिरतो अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांचं तू मारल्यासारखे करायचे आणि मी रडल्यासारखे करतो असे सुरु आहे. मात्र मुंबईत हे तिघे एकत्र मिळून मलई खातात. पिंपरी चिंचवडमध्ये अजित पवार भाजपविरोधात बोलले आणि नंतर संध्याकाळी फोन आला की लगेच नरमले. माझे नाव असदुद्दीन ओवैसी आहे,

# पाटोद्यात पत्रकार दिन उत्साहात साजरा; अंगद सांगळे यांच्या वतीने पत्रकार बांधवाचा लेखणी देऊन सन्मान

पाटोदा (प्रतिनिधी) पाटोदा तालुक्यात पत्रकार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे पाटोदा तालुकाध्यक्ष अजय जोशी हे होते. या कार्यक्रमात आमदार सुरेश धस यांचे मावळे अंगद सांगळे यांच्या वतीने पत्रकार बांधवांचा लेखणी देऊन सन्मान करण्यात आला. लेखणी ही पत्रकाराच्या



सत्य, निर्भीड व निःपक्ष पत्रकारितेचे प्रतीक असल्याने या सन्मानाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. यावेळी युवा पत्रकार जितेंद्र भोसले यांनी पत्रकारितेच्या मूल्यांवर आपले विचार मांडले. समाजातील अन्यायाविरुद्ध निर्भीडपणे उभे राहणारी, सत्यनिष्ठ आणि जबाबदार पत्रकारिता हीच लोकशाहीचा खरा कणा असल्याचे त्यांनी नमूद केले.अध्यक्षीय भाषणात अजय जोशी यांनी पत्रकार दिनाच्या शुभेच्छा देत पत्रकारांनी सामाजिक बांधिलकी जपत लोकहितासाठी काम करत राहावे, असे आवाहन केले. कार्यक्रमामुळे पत्रकारांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून पत्रकारितेची मूल्ये जपण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला कार्यक्रमाचे आभार पत्रकार जावेद शेख यांनी मानले

## दैनिक लोक इच्छाला लोकरत्न पुरस्कार जाहीर...



बीड - समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यासाठी दिला जाणारा "लोकरत्न पुरस्कार" काल दैनिक लोक इच्छाला जाहीर करण्यात आला. या पुरस्काराच्या घोषणेमुळे बीड जिल्ह्यासह परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.दैनिक लोक इच्छाला गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक बांधिलकी जपत जनहिताचे प्रश्न मांडत आहे . समाजासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा योग्य सन्मान व्हावा या उद्देशाने लोकशाही पत्रकार संघ व सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशन बीड आयोजित लोकरत्न पुरस्काराची सुरुवात करण्यात आली आहे. या पुरस्कारासाठी शिक्षण, सामाजिक कार्य, आरोग्य, कला-क्रीडा, साहित्य, पत्रकारिता तसेच ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानाचा विचार करण्यात आला आहे.पुरस्कारार्थींची निवड करताना त्यांच्या कार्याची सातत्यपूर्ण वाटचाल, समाजावर झालेला सकारात्मक परिणाम, प्रामाणिकपणा व प्रेरणादायी कार्य या निकषांचा आधार घेण्यात आला असल्याची माहिती लोक इच्छालाच्या संपादक मंडळाने दिली. निवड प्रक्रिया पारदर्शक ठेवण्यात आली असून अनेक मान्यवरांच्या सूचनांचा व अभिप्रायाचा विचार करण्यात आला बाळशास्त्री जांभेकर दर्पण दिनानीमित्त लोकरत्न पुरस्कार वितरण सोहळा काल बीड येथे आयोजित करण्यात आला होता, ज्या कार्यक्रमाला विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.दैनिक लोक- इच्छाचे संपादक इमाद इनामदार यांना समितीच्या वतीने देण्यात आलेल्या या पुरस्काराचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

# लोक इच्छा कार्यालयात सिल्लोडच्या पत्रकार नीलोफर शेख मॅडम यांचा सत्कार

सिल्लोड येथील कर्तव्यदक्ष पत्रकार नीलोफर शेख मॅडम यांचा दैनिक लोक इच्छा कार्यालयात औपचारिक सत्कार करण्यात आला. हा सत्कार दैनिक लोक इच्छाच्या निवासी संपादक नेहा खान यांच्या हस्ते करण्यात आला. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील प्रश्न, सामान्य जनतेच्या समस्या, महिलांचे प्रश्न तसेच सामाजिक घडामोडी सातत्याने मांडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य नीलोफर शेख मॅडम यांनी केले आहे. त्यांच्या निर्भीड,



प्रामाणिक व वस्तुनिष्ठ पत्रकारितेमुळे सिल्लोड तालुक्यात त्यांना विशेष ओळख मिळाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत लोक इच्छा परिवाराच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी निवासी संपादक नेहा खान यांनी नीलोफर शेख मॅडम यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, "समाजासाठी प्रामाणिक पत्रकारिता करणारे पत्रकार हेच लोकशाहीचे खरे आधारस्तंभ आहेत. नीलोफर शेख मॅडम यांचे कार्य नव्या पिढीतील पत्रकारांसाठी प्रेरणादायी आहे."

सत्कारप्रसंगी उपस्थित मान्यवरांनीही नीलोफर शेख मॅडम यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी लोक इच्छा परिवारातील पत्रकार, कर्मचारी व प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रम आनंदी व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



जि.प.शिक्षण विभाग बीड, जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार सन २०२४.

**गेवराई (प्रतिनिधी) तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा शिरसमार्ग येथील केंद्रप्रमुख तथा केंद्रिय मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असणारे श्री गणेश दहिवळ सर यांना जिल्हा परिषद बीड शिक्षण विभागाच्या वतीने प्रतिवर्षी दिला जाणारा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार दि.०१ जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री जिल्हा बीड मा.श्री अजित (दादा)पवार साहेब व सर्व मान्यवर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.**

# पत्रकारिता हे समाजाचे कवच कुंडल आहे - अमरनाथ खुर्पे

.......................................
माजलगाव प्रतिनिधी दिनांक 06/01/2026
.......................................

आज विविध मीडियातील बातम्यांनी आपले आयुष्य व्यापले आहे. बातमी हा आपल्या रोजच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे म्हणून पत्रकरिता हे समाजाचे कवचकुंडल आहे असे प्रतिपादन भा.शि.प्र संस्थेचे केंद्रीय सदस्य अमरनाथ खुर्पे यांनी केले ते श्री सिद्धेश्वर महाविद्यालय दर्पण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड हे होते तर याप्रसंगी व्यासपीठावर स्थानिक पदाधिकारी ॲड. विश्वासराव जोशी प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रारंभी दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

पुढे बोलताना प्रमुख पाहुणे अमरनाथ खुर्पे म्हणाले की, लोकशाहीच्या चौथ्या आधारस्तंभाचा आज आपण वर्धापन दिवस साजरा करत आहोत. तो म्हणजेच दर्पण दिन होय. विद्यार्थ्यांनी समाजाप्रती आपले उत्तरदायित्व लक्षात घेत व संवेदना जागवत या क्षेत्रात कार्यरत व्हावे. पत्रकारितेमधून समाजातील दीपस्तंभ सारखे कार्य केलेल्या व्यक्तींचा लेखाजोखा समाजासमोर मानला जातो. घटनेमध्ये असलेले तथ्य व सत्य पत्रकारितेमुळे लोकांसमोर येते. पत्रकारिता हा समाजाचा आरसा आहे. निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींचे देखील काय कार्य चालले आहे हे आज पत्रकारिता लोकांसमोर आणते. जोपर्यंत सूर्य,चंद्र, तारे आहेत तोपर्यंत या जगावर पत्रकारांचे राज्य राहणार आहे. वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या बुलंद पत्रकातील पत्रकारितेचे उदाहरण देऊन देखील त्यांनी पत्रकारिता विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. एक विचारधारा जोडण्याचे कार्य पत्रकारिताच्या माध्यमातून केले



जाते. सकाळी उठलो की टी.व्ही. वर्तमानपत्र पाहून आसपास काय घडले याचे ज्ञान आपल्याला होते. समाजातील छोट्या मोठ्या समस्येचा वहपोह पत्रकारितेच्या माध्यमातून केला जातो. पत्रकारिता हे समाजाचे एक अनेक समस्याचे व्यासपीठ आहे. येथे अनेकांना व्यक्त होत आहे ते व या समस्यावर उपाययोजना देखील सांगता येतात. बरेच गैर कारभार करणारे शासकीय कर्मचारी पत्रकारितेच्या माध्यमातून प्रसिद्ध झालेल्या बातमीच्या अनुषंगाने निलंबित झालेले आहेत. समस्याशी भिडण्याचे धाडस हे फक्त पत्रकारांमध्येच असते. म्हणूनच म्हटले जाते की पत्रकारांचा सिक्स सेन्स हा नेहमी जागृत असतो. म्हणूनच पत्रकारिता हा समाजाचा एक अविभाज्य भाग बनला आहे असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांनी म्हटले की, आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती आपण दर्पण दिन म्हणून साजरी करतो. दर्पण हे वृत्तपत्र काढण्याचा त्यांचा उद्देश समाज प्रबोधन व सामान्य लोकांना योग्य दिशा दाखविण्याचा होता.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना अभय कोकड यांनी म्हटले की, 'दर्पण 'म्हणजे आरसा तसे वर्तमानपत्रे हे समाजाचा आरसा आहेत या क्षेत्रात विद्यार्थ्यांना मोठे होण्याची निश्चित संधी आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.रमेश गटकळ यांनी केले व मान्यवरांचे आभार डॉ. उमेश साडेगावकर यांनी मानले. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ.गजानन होंन्रा, डॉ.युवराज मुळये, प्रा. अंकुश साबळे पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री कार्यालय अधीक्षक श्री उत्तरेश्वर आनेवार तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com